महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७ वे | दिनांक : १७/०१/२०२६ | वार : शनिवार

## अमृता फडणवीसांचा राज-उद्धव ठाकरेंच्या युतीवर अप्रत्यक्ष निशाणा



मुंबई : महानगरपालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी ठाम शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. मराठी माणसाने विकास, प्रगती आणि कामगिरीला प्राधान्य देत भाजपला कौल दिला असून भाषा-प्रांताच्या नावावर भेदभावाचं राजकारण करणाऱ्यांना हा स्पष्ट इशारा आहे, अशा शब्दांत त्यांनी या निकालामागील जनतेचा संदेश अधोरेखित केला आहे. देवेंद्र फडणवीसांची मुलगी दिविजा यांनीही वडीलांना मिठी मारुन आनंद व्यक्त केला.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवत ऐतिहासिक यश संपादन केलं आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईवर पहिल्यांदाच भाजपची सत्ता स्थापन होत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा मोठा राजकीय टप्पा गाठण्यात आला आहे. या निकालामुळे मुंबई महानगरपालिकेत भाजपचा महापौर विराजमान होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. अनेक दशकांपासून काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांच्या ताब्यात राहिलेल्या बीएमसीत भाजपने अखेर सत्ता मिळवत आपली ताकद सिद्ध केली आहे.

या विजयाने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून भाजप समर्थकांमध्ये जल्लोषाचं वातावरण आहे. मुंबईतील मतदारांनी विकास, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील स्थैर्य या मुद्द्यांना प्राधान्य देत भाजपच्या बाजूने कौल दिल्याचं या निकालातून दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात राबवण्यात आलेल्या विविध विकासकामांचा प्रभाव थेट मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर पडल्याचं राजकीय विश्लेषक मानत आहेत. भाजपच्या या विजयामुळे राज्यात सत्ताधारी पक्षाची पकड अधिक मजबूत झाल्याचंही चित्र आहे.

या ऐतिहासिक विजयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी खास प्रतिक्रिया देत आनंद व्यक्त केला. त्यांनी विजयाबद्दल देवेंद्र फडणवीस यांचं औक्षण करत कुटुंबीय आनंद साजरा केल्याचं पाहायला मिळालं. राजकीय यश केवळ आकड्यांपुरतं मर्यादित नसून, त्यामागे असलेली मेहनत आणि लोकांचा विश्वास याचं प्रतीक असल्याचं त्यांनी आपल्या प्रतिक्रियेतून अधोरेखित केलं. एका पत्नीच्या भूमिकेतून त्यांनी व्यक्त केलेला हा आनंद आणि अभिमान भाजप समर्थकांसाठी भावनिक क्षण ठरला.

अमृता फडणवीस यांनी आपल्या शब्दांतून केवळ अभिनंदनच केलं नाही, तर विरोधकांवर सूचक शब्दांत टीकाही केली. आज मराठी माणसाने विकासकामांना महत्त्व देणाऱ्या, प्रगती साधणाऱ्या पक्षाला भरभरून मतदान करून आपली पसंती दिली आहे, असं म्हणत त्यांनी या विजयामागील जनतेची भूमिका स्पष्ट केली. त्याचबरोबर, मराठी माणसावरून, भाषा आणि प्रांतावरून निरर्थक भेदभावाचं राजकारण करणाऱ्यांना हा एक सूचक संदेश आहे, असं म्हणत त्यांनी विरोधकांच्या राजकारणावर थेट बोट ठेवलं. या शब्दांतून मुंबईच्या मतदारांनी कोणत्या प्रकारचं राजकारण नाकारलं आहे, हेही त्यांनी अधोरेखित केलं.

मुंबई महानगरपालिकेतील हा निकाल केवळ एका निवडणुकीपुरता मर्यादित न राहता, पुढील राजकीय दिशा ठरवणारा ठरू शकतो. विकासाच्या मुद्द्यावर केंद्रित राजकारणाला जनतेकडून पाठिंबा मिळतो आहे, तर ओळख, भाषा आणि प्रांत यांवर आधारित राजकारणाला मतदारांनी नकार दिल्याचं या निकालातून स्पष्ट होत आहे. भाजपच्या स्पष्ट बहुमतामुळे मुंबईतील निर्णयप्रक्रिया अधिक वेगाने होईल, असा विश्वास पक्षाकडून व्यक्त केला जात आहे. शहराच्या पायाभूत सुविधांपासून ते वाहतूक, स्वच्छता आणि डिजिटल प्रशासनापर्यंत मोठे निर्णय आता सहज शक्य होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

एकूणच, मुंबई महानगरपालिका निवडणुकीतील भाजपचा हा विजय ऐतिहासिक मानला जात असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाला मिळालेली ही मोठी राजकीय पावती ठरत आहे. अमृता फडणवीस यांनी व्यक्त केलेला आनंद आणि त्यांनी दिलेला संदेश हे या विजयाचं भावनिक आणि राजकीय दोन्ही अंग अधोरेखित करतात. मुंबईकरांनी विकासाला दिलेला कौल आणि भाजपवर दाखवलेला विश्वास आगामी काळात शहराच्या कारभाराला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुंबईत ठाकरे कुटुंब ३० वर्षांनंतर सत्तेतून बाहेर



मुंबई : मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपचा महापौर होऊ शकतो. बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) निवडणुकीच्या निकालात भाजप आघाडीला एकूण २२७ जागांपैकी ११८ जागांवर आघाडी मिळाली आहे. यामध्ये भाजप ९०, शिवसेना शिंदे गट २८ जागांवर पुढे आहे.

स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेवर काँग्रेस आणि शिवसेनेचेच वर्चस्व राहिले आहे. १९४७ ते १९६७ पर्यंत म्हणजे २० वर्षे काँग्रेसचा महापौर होता. तर १९९२ ते २०२२ म्हणजे ३० वर्षे महापौरपदावर शिवसेनेचे वर्चस्व होते. भाजपने ४५ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच मुंबईत आपला महापौर बनवण्याच्या स्थितीत पोहोचली आहे. खरं तर, १९८० मध्ये पक्षाची स्थापना झाल्यानंतर भाजपने १९९२ ते २०१७ पर्यंत मुंबईत शिवसेनेला पाठिंबा दिला होता.

मुंबईच्या महापौरपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या शेवटच्या व्यक्ती शिवसेनेच्या किशोरी पेडणेकर होत्या, ज्यांनी २२ नोव्हेंबर २०१९ ते ८ मार्च २०२२ पर्यंत हे पद सांभाळले होते. त्यावेळी शिवसेनेत फूट पडली नव्हती. त्यानंतर हे पद रिक्त होते. तेव्हापासून, BMC च्या प्रशासनाची जबाबदारी नगर आयुक्त सांभाळत आहेत.

## संभाजीनगरमध्ये भाजपच ठरला मोठा भाऊ, शिवसेनेला फटका तर एमआयएमचा झटका



छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या राज्याचं लक्ष लागून राहिलं होतं. ६० टक्के मतदान झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी दिलेला कौल स्पष्टपणे भाजपच्या बाजूने झुकलेला दिसून आला आहे. शिवसेनेसोबत युती न करता स्वबळावर लढण्याचा निर्णय भाजपसाठी फायदेशीर ठरला, तर हाच निर्णय शिंदे गटाच्या शिवसेनेसाठी अंगलट आला आहे. निकालांचे चित्र स्पष्ट होत असताना भाजप सर्वाधिक जागांवर आघाडी घेतली असून महापालिकेत शतप्रतिशत सत्तेपर्यंत मजल मारली आहे. याउलट, 'आम्हीच मोठा भाऊ' असा दावा करणाऱ्या शिंदेंच्या शिवसेनेला आता लहान भावाच्या भूमिकेत राहावे लागणार आहे.

या निवडणुकीत विशेष बाब म्हणजे भाजप, शिंदे गटाची शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), एमआयएम आणि वंचित बहुजन आघाडी-सर्वच पक्षांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. कोणतीही औपचारिक युती नसताना देखील भाजपने सर्वाधिक स्ट्राइक रेट राखला. बंडखोरी, अंतर्गत नाराजी आणि तिकीट वाटपावरील असंतोष असूनही भाजपने मतदारांचा विश्वास मिळवला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टाॅक शो आणि प्रचारसभांमधून विकासकामांचा लेखाजोखा मांडत 'भगव्याची शान राखा' असं थेट आवाहन केलं होतं, त्याला संभाजीनगरच्या मतदारांनी प्रतिसाद दिल्याचं निकालातून दिसून आलं.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतरामध्ये मातंग समाजाचे मोठे योगदान - प्रा. डॉ. सूर्यकांत सांभाळकर




**कन्नड (प्रतिनिधी ) :** छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड संचलित शिवाजी महाविद्यालय कन्नड जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला त्यादिनानिमित्त डॉक्टर प्राध्यापक सूर्यकांत सांभाळकर संत तुकाराम महाविद्यालय कन्नड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व त्यांनी त्यांच्या व्याख्यानामध्ये नामविस्तारामध्ये मातंग समाजाचे योगदान या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर प्राचार्य व्ही एन भोसले सर होते १४ जानेवारी २०२६ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाचे नावाचा विस्तार करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे नामविस्तार करण्यात आले नामांतराच्या या लढ्यासाठी चळवळ उभी राहिली होती त्यामुळे हा दिवस दरवर्षी उत्साहाने महाविद्यालय साजरा केला जातो.त्यानिमित्त डॉक्टर सूर्यकांत सांभाळकर यांचे व्याख्यान शिवाजी महाविद्यालय कन्नड येथे आयोजित केले होते.त्यावेळी डॉक्टर संभाळकर यांनी आपले विचार मांडले. नामांतरणामध्ये मातंग समाजाचे योगदान भरपूर आहे. सुरुवातीला मराठवाडा विद्यापीठाला कोणते दोन नाव द्यावे त्यापैकी व्यक्तीवाचक नाव म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे दोन व्यक्तीवाचक नाव समोर आली आणि बाकी भौगोलिक नाव समोर आली आणि हा लढा उभा राहिला त्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे ही भूमिका प्रामुख्याने इथल्या काही राजकीय पक्षांनी घेतली सुरुवातीला हा लढा जो होता तो जाती आधारित नव्हताच पण नंतर याला स्वरूप राजकीय लोकांनी राजकारण आणल्यामुळे हा लढा एका विशिष्ट वळणाकडे गेला कारण सुरुवातीला युक्रांत या संघटनेने १९७७ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ नामांतराची मागणी केली होती.याचवेळी १३ जुलै १९७८ ते १४ जुलै १९९४ हा नामांतराचा संघर्षाचा कालखंड होता. १९५८ ला विद्यापीठाची स्थापना झाली त्यावेळी विद्यापीठाला नाव काय द्यावे. दोन नावे व्यक्तिवाचक होते त्यामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव समोर येण्याचे मुख्य कारण म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाडा विभागात बहुजनांच्या मुलासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून उच्च शिक्षणाची सुरुवात मराठवाड्यात त्यांनी केलेली होती. माणिकचंद पाहडे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना म्हणले म्हणाले होते की, महाविद्यालय काढून काय होणार ?त्यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना बोलून दाखवलं होतं की या प्रदेशातील एक महाविद्यालय नाहीतर एक विद्यापीठ काढावे लागेल असं डॉक्टर सांभाळकर सर यांनी व्याख्यानात नमूद केलं आणि हा नामांतर लढा प्रदीर्घकाळ चालला नागपूर ते मुंबई लॉंग मार्च दलित पँथर संघटना लढा उभारून चळवळ अधिक गतिमान केली आणि या गतिमान चळवळीमध्ये ही मातंग समाज हिरीरीने भाग घेतला. त्यामध्ये नामांतर होण्यासाठी विधानसभेच्या गॅलरीतून उड्या मारणारे मातंग समाजाचे कार्यकर्ते होते त्याच पद्धतीने नामांतर लढ्यासाठी हुतात्मा झालेले महिला सह पुरुष हुतात्मा हे मातंग समाजातील आहेत त्यामध्ये जनाबाई थोरात घनसावंगी गोचीराम कांबळे जनार्दन मेवाडे जळकोट जिल्हा लातूर भुरेवार पोलीस इन्स्पेक्टर यांना कार्यरत असताना त्यांना जमावाने पेटवून दिले शिक्षक बाबुराव लोंढे पाटोळे प्रतिभा तायडे असे अनेक जण मातंग समाजातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नामांतर होण्यासाठी हुतात्मा झालेल्या आहेत. डॉ. सूर्यकांत संभाळकर यांनी त्यांच्या व्याख्यानात नमूद केले त्याच पद्धतीने मातंग समाजाचे एकनाथ आव्हाड यांनी मुख्यमंत्री व पंतप्रधान यांना जवळपास आठ पानाचे पत्र लिहूनही नामांतराची मागणी केलेली होती. अशा पद्धतीने मातंग समाजातील युवक युवती ह्या देखील नामांतर लढ्यामध्ये सामील झालेले होते. त्याच पद्धतीनं ग्रामीण भागामध्ये बहुसंख्यांक ज्या जाती त्या त्या गावांमध्ये प्रस्थापित आहेत त्या सर्व जातींनी दलित समाजावर त्या काळात अन्याय केला. त्यामध्ये स्वर्ण ओबीसी व इतर मायक्रो ओबीसी ज्या जाती त्यागावात प्रस्थापित होत्या त्या सर्व प्रस्थापित जातीनी गावांमध्ये गावातील दलित समाजाला त्रास देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे घर पेटवून देण्याची प्रयत्न केले. हा लढ्यामध्ये राजकीय लोकांनी सहभाग घेतला. धार्मिक वादावर आणि जातिवादावर आणून ठेवला गेला. प्रमुख्याने महाराष्ट्रामध्ये व महाराष्ट्रात नामांतर विरोधी व नामांतर समर्थक असे दोन गट सर्वच समाजात सर्वच जाती धर्मात पडलेले आपल्याला त्या काळात दिसून आले. नामांतराला विरोध करणारे हे लोक पाच टक्के फक्त होते पण त्यांना काही राजकीय पक्षांची पाठिंबा मोठ्या प्रमाणात होता.त्यांनी त्या काळामध्ये दंगली देखील घडून आणलेले आपल्याला दिसून येतात. त्यामध्ये मातंगासह दलित समाज हा होरपळून निघालेला आपल्याला दिसून येतो.प्रमुख्याने मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील जी सर्वसामान्य जनता होती शेतकरी कष्टकरी शेतमजूर महिला यांचा विरोध कधीच नामांतरांना नव्हता किंवा इथल्या बऱ्याच बुद्धिवंत चाही विरोध नव्हता पण काही लोकांनी मतपेटीतून आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी ह्या लढ्यात प्रामुख्याने भाग घेतला आणि समाजामध्ये दोन गट निर्माण करण्याचा प्रयत्न केला म्हणून ह्या लढ्याची धग अधिक जाणवलेली आहे .डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला इथल्या शोषित वर्ग सर्व समाजातील धर्मातील यांनी पाठिंबा दिलेला होता. राजकारणी लोकांनी स्वतःच्या फायद्यासाठी या लढायला वेगळे वळण दिलं गेलं. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे नामांतरण नामविस्तार १४ जानेवारी १९९४ ला शरद पवार मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख महसूल मंत्री पद्मसिंह पाटील गृहमंत्री आणि विरोधी पक्षनेते माननीय गोपीनाथरावजी मुंडे या मराठवाड्यातील प्रमुखांनी ही नामांतर लढ्यासाठी योग्य भूमिका घेतली आणि यांनी सर्वांनी ताकद उभा केली आणि नामांतर विद्यापीठाचे करून त्या ठिकाणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार केला अशा पद्धतीने मांडणी श्री सूर्यकांत सांभाळकर यांनी मांडली. त्याच पद्धतीने जे बुद्धीहीन लोक होते यांना हाताखाली धरून काही राजकीय लोकांनी त्या काळात मोठ्या प्रमाणात दंगल घडून आणली दलितांचे घर जाण्यात आले त्यांना त्रास देण्यात आला त्यामध्ये मातंग समाजाच्या वस्ती देखील होत्या मातंग समाजाच्या वस्तीवर देखील जाऊन अशा बुद्धीहीन लोकांनी ज्यांना की शिक्षणाचा ज्ञान नाही बाबासाहेबांच्या कार्याची जाण नव्हती बाबासाहेबांचे कर्तृत्व माहिती नव्हतं अशा लोकांनी जाणीवपूर्वक मातंग समाजाच्या ही घरे जाळण्याचे काम काही राजकीय पक्षांनी केलं म्हणून हा लढा जो आहे तो सर्वसामान्य व्यक्तीने हातात घेतला होता सर्व धर्म समभावातील लोकांनी हा लढला पाठिंबा दिला होता पण काही राजकीय लोकांच्या फायद्यासाठी विरोध तयार झाला लढ्यामध्ये विघ्न संतोष आणायची भूमिका घेतली होती तरी पण हा लढा यशस्वी झाला नामांतरण झालं.अध्यक्षीय समारोप करताना डॉक्टर प्राचार्य भोसले सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारताला एक मोठी देणगी त्यांनी राज्यघटना शिल्पकार होऊन दिलेली आहे सर्व समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी काम केलेले आहे नामांतराचा लढा हा सर्वसामान्य लोकांनी हातात घेतल्यामुळे यशस्वी झाला असे विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नामविस्तार दिन डॉक्टर प्राचार्य व्हि.एन.भोसले यांनी मांडले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठवाड्यासाठी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आणि त्या मिलिंद महाविद्यालयातलच विद्यापीठ स्थापन झालं त्यावेळेस मिलिंद महाविद्यालयाचा स्टाफ त्या ठिकाणी कार्यरत होता अशा पद्धतीने त्यांनी मांडणी केली या कार्यक्रमाला व उप प्राचार्य डॉक्टर बी के मगर उपस्थित होते.डॉक्टर आर के पवार यांनी प्रस्तावित केले सूत्रसंचालन प्राध्यापक मोगल एस के यांनी केले तर आभार डॉक्टर बी.जी. देशमुख यांनी माडले. कार्यक्रमाला शिक्षक शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वत: लाच धडपड करावी लागते - प्रियांका ओसवाल



**कन्नड (अरुण थोरात) :** ज्या ज्या गोष्टी आयुष्यात मागे खेचतात त्याकडे धनुष्याच्या दोरीसारखे समजावे. आपत्तीचे संधीत रूपांतर करायचे. कुठल्याही गटात जाण्याची तयारी हवी. नेतृत्व करण्याची सवय ठेवावी. एअर्स फोर्स व आर्मी नेव्ही क्षेत्रात खूप मोठ्या संधी आहेत. तुमचे वय हे स्वप्न बदलण्याचे वय आहे. त्यासाठी झपाटून वेड लागलं पाहिजे. मी काही तरी करू शकते हा आत्मविश्वास असावा. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वतःलाच धडपड करावी लागते असे प्रतिपादन प्रियांका ओसवाल यांनी केले. ज्या लोकांनी मला तू शक्य करू शकत नाही मी ते करून दाखविले. मुलींना एअर्स फोर्स मध्ये मोठी संधी आहे. त्यासाठी भाषेचे बंधन नाही. माझे शिक्षण मराठी माध्यमात झाले. जिद्द , चिकाटी, आत्मविश्वास आणि प्रयत्न करण्याची तयारी असेल तर अशक्य काहीच नाही असे ही त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळसाहेब पवार फाऊंडेशन कन्नड यांच्या वतीने कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात तिन दिवशीच व्याख्यानमालेस आजपासून सुरुवात झाली. (ता. १५ ) पहिले पुष्प भारतीय वायु सेनेतील सेवा निवृत्त अधिकारी प्रियांका ओसवाल यांनी संरक्षण क्षेत्रातील संधी या विषयावर गुंफले. त्यांची मुलाखत नविन काळे स्वयंमं ये सह समन्वयक यांनी त्यांची मुलाखत घेतली.या कार्यक्रमास श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार, सचिव चंद्रकांत देशमुख, प्राचार्य डॉ. विजय भोसले, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, मतसागर, बाबुलाल काळे, पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष विठ्ठल शिरसे, राजानंद सुरडकर ,वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, डॉ. रुपेश मोरे, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर, डॉ. उदय डोंगरे, डॉ. के. एल. भानुसे, रामकृष्ण तुपे, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. शिवाजी हुसे, प्रा. एस.टी. नागे, प्रा. एच. जी. पवार, प्रा. संतोष देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रशांत शिंदे यांनी तर आभार प्रा. संतोष मतसागर यांनी मानले.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


## जयभवानी महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जंयती साजरी



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,कला व विज्ञान महाविद्यालयात "सांस्कृतिक विभागाच्या " वत्तीने राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ साहेब व युवकांचे प्रेरणास्त्रोत स्वामी विवेकानंद यांची जंयती साजरी करण्यात आली.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्या नंतर सामुहिक अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय समारोप करण्यात आला.कार्यक्रमाचे संचलन प्रा.बापू घोक्षे यांनी केले.तर आभार प्रा.डॉ.रामकृष्ण प्रधान यांनी मानले या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीज्ञव बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## दौलताबाद येथे भाजप कार्यकत्यांच्या जलोष



**दौलताबाद (जावेद अहमद) :** महाराष्ट्र राज्यातील विविध महानगरपालिकेच्या झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे दणदणीत विजय मिळवला तसेच छत्रपती संभाजीनगर येथे ५८ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष म्हणून निवड झाली आहे त्याबद्दल दौलताबाद येथे भाजप चे संभाजीनगर अल्पसंख्याक मोर्च्याचे जिल्हा संघटन मंत्री शेख बने,विलास जाधव, गुलाबराव बळी, हरसिंग पुसे, राजू जाधव, बाळू रोकडे, कृष्णा रोकडे, शाहरुख शेख यांनी दौलताबाद बस स्टँड येथे दि १६ शुक्रवारी फटाके फोडून जलोष केले


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## आधार कार्ड वैद्यतेच्या आधारे शिक्षक निर्धारण करू नये - विजय कोंबे

**कन्नड (अरुण थोरात) :** सन २०२५-२६- आधार कार्ड आधारित संचमान्यता न करता शाळेत प्रवेशित व प्रत्यक्ष उपस्थितीची पडताळणी करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवण्यासाठी आरटीईनुसार मान्य केलेली किमान शिक्षक मिळणे विधीसंमत आणि न्यायसंगत आहे करिता आधार कार्ड वैद्यतेच्या आधारे शिक्षक निर्धारण करू नये अशा संदर्भाचे निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे राज्य सरचिटणीस राजन कोरगांवकर यांनी एका निवेदनाद्वारे दिल्याचे शिक्षक समितीचे मराठवाडा विभागीय प्रसिद्धप्रमुख सतीश कोळी यांनी कळविले आहे.शालेय शिक्षण विभागाचे पत्र क्रमांक: एसएसएन-२०१५/(प्र.क्र.१६/१५)/टीएनटी-२ दि. २३/१२/२०२५व मा. सर्वोच्च न्यायालय याचिका Writ Petition (Civil) No.494 of 2012 decided on 26th Sept. 2018 मधील उल्लेखउपरोक्त विषयांकित बाबतीत निवेदनात म्हटले आहे की - आधार वैध विद्यार्थी संख्या संचमान्यता निर्धारणासाठी विचारात घेण्याचे संदर्भित-१ च्या शासन पत्रात नमूद आहे.पालकांची भटकंती, दुर्गम भागातील अडचणी, पालकांकडून आधार कार्ड मधील नोंदी अद्ययावतीकरण संबंधाने असणारी अनास्था आदी कारणांमुळे शाळेत विद्यार्थी प्रविष्ट असताना सुद्धा आधार कार्ड वैधता पूर्ण होत नाही.परिणामी पुरेशी विद्यार्थी संख्या असूनही संचमान्यतेत असे विद्यार्थी धरले जात नसल्याने शिक्षकांची पदे कमी होतात. यामुळे शेवटी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. तसेच शाळेत शिक्षक कमी असल्याने पालक विद्यार्थ्यांची नावे काढून नेतात व त्याचा परिणाम शाळेच्या पटसंख्येवर होतो. अर्थात शेवटी नुकसान मात्र विद्यार्थ्यांचेच होते.अनेक शिक्षण तज्ज्ञ,शिक्षण विभागातील सेवानिवृत्त उच्च पदस्थ अधिकारी आणि शिक्षक संघटना विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वैधतेच्या आधारे शिक्षक निर्धारणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ होत आहे अशी भूमिका सातत्याने शिक्षक समिती म्हणून आम्ही मांडत आलो.कारण हा विषय केवळ शिक्षकांची पदे टिकविणे नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्कासाठी निगडित आहे. देशभरातील इतर अनेक राज्यात आधार कार्ड वैधतेच्या आधारे शिक्षक निर्धारण केले जात नाही. महाराष्ट्र सारख्या प्रगत आणि शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणात पथदर्शक राज्यात RTE-२००९ नुसारच नव्हे; तर शासन निर्णय २८ ऑगस्ट १९८० मध्ये ठरविलेल्या शिक्षक निर्धारण निकषानुसार शिक्षक देणे आवश्यक आहे. परंतु या सर्व चांगल्या बाजू अव्हेरून आधार कार्ड वैधता आधारित शिक्षक पदे निश्चित करणे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होण्यास कारण ठरत आहे.(२ अ)नुकताच दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाच्या (Writ Petition No. 14377 OF 2025) निकाल पत्रात Page 3, 4 Sr No. 4 - तसेच Writ Petiton (Civil) No.494 of 2012 & connected matters Page No. 20 of 567 and Page No. 21 of 567 वरील २ अ व २ ब वर उल्लेखित चा अर्थ लक्षात घेता शाळेतील विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वैधतेचा संचमान्यता शिक्षक निर्धारण करिता संबंध जोडणे योग्य ठरणार नाही अशी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून आमची ठाम धारणा आहे.त्यामुळे २०२५-२६ ची संचमान्यता शिक्षक निर्धारण करताना विद्यार्थी आधार कार्ड वैधता गृहीत न धरता शाळेत प्रविष्ट विद्यार्थी संख्या आणि शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेच्या माध्यमातून प्रत्यक्ष पटपडताळणी करून अंतिम निर्धारण करावे.अन्यथा/जर न्यायालयाच्या आदेशातील वर उल्लेखित मजकुराचा अर्थ काढून शिक्षक निर्धारण संचमान्यता करिता वरील उल्लेखित बाबी लागू होत नसल्यास महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून आमची धारणा चुकीची असल्याबाबत तातडीने कळवावे ज्यायोगे न्यायालयात जाण्यासाठी आम्हाला निर्णय घेणे शक्य होईल. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी RTE नुसार मान्य केलेले किमान शिक्षक मिळणे विधिसंमत आणि न्यायसंगत आहे. करिता आधार कार्ड वैधतेच्या आधारे शिक्षक निर्धारण करू नये अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## अय्युब पठाण यांना राज्यस्तरीय बालसाहित्य पुरस्कार प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :- (प्रतिनिधी)** पालघर जिल्हयातील वाडा येथील साहित्य कला विचार मंच आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलनात मराठवाड्याचे प्रसिध्द बालकवी अय्युब पठाण लोहगावकर यांचा बालकांच्या भावविश्वाला मनोरंजनातून आनंद देणारा आणि आशयघन व दर्जेदार बालकविता संग्रह "अंगत पंगत." ला राज्यस्तरीय अक्षर साधना बालसाहित्य पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप आकर्षक स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे आहे. "अंगत पंगत " ला हा सलग राज्यस्तरीय पाचवा पुरस्कार मिळालेला आहे. अक्षर साधना बाल साहित्य पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगावकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


## आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा ! यश मिळतेच! :- पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत




**पाटोदा (प्रतिनिधी) :** दि.१३ जानेवारी : आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा ! यश मिळतेच !असे प्रतिपादन बीड जिल्ह्याचे दबंग कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक मा.श्री.नवनीत कॉवत साहेब यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या "करिअर कट्टा "अंतर्गत " मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उदघाटन सोहळ्यात प्रमुख उदघाटक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की ग्राणीण भागातील विद्यार्थी एकदा अपयश आले की खचुन जातात.अपयशाने खचुन न जाता जिद्द,परिश्रम, योग्य नियोजन करून आत्मविश्वासाने स्पर्धा परीक्षेस सामोरे जा! यश नक्कीच मिळते.आपल्या स्वतःच्या बालपणापासून शैक्षणिक आठवणी सांगुन परस्थितीवर मात करून इथपर्यंत ते कसे आले हे भावनिक होऊन सांगितले. युपीएससी परीक्षेची पुर्वतयारी कशी करावी.हे सांगताना अभ्यासक्रम, नियोजन, जिद्द, चिकाठीने अभ्यास कसा करावा हे सांगितले.पोलीस प्रशासनातील सेवेचे अनुभव सांगुन,भविष्यात राष्ट्रसेवा व समाजसेवेला प्राधान्य द्यावे!अशी अपेक्षा व्यक्त केली.विद्यार्थ्यांच्या आनेक प्रश्नाना त्यांनी समाधानकारक उत्तरे देवुन शंकेचे निरसन केले.या उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर स्वागताध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.व्यासपीठावर उच्च न्यायालय खंडपीठ छ.संभाजीनगरचे ॲड. तात्यासाहेब घुमरे (पवार ) यांची प्रमुख उपस्थिती होती.पोलीस अधीक्षक मा.श्री. नवनीत कॉवत साहेब यांचे आगमन होताच महाविद्यालयात स्वसंरक्षणासाठी मुलींना मोफत कराटे प्रशिक्षण दिले जाते.त्या कराटे प्रशिक्षणाचे चित्तथरारक प्रात्यक्षिक करण्यात आले. ग्रामीण भागात कराटे चे प्रशिक्षण पाहुन त्यांनी समाधान व्यक्त केले.गुणवंत शिक्षक प्रा.शिवाजीराव भोरे व गुणवंत विद्यार्थ्यांचा मा.श्री.नवनीत कॉवत यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.भव्यदिव्य फुलांच्या वर्षावात त्यांचे औक्षणकरुन स्वागत करण्यात आले.मान्यवरांच्या शुभहस्ते दिपप्रज्वल करून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन करण्यात आले.या प्रसंगी ॲड.तात्यासाहेब घुमरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थी योग्य मार्गदर्शना आभावी स्पर्धा परीक्षेकडे जात नाहीत.तेव्हा अशा मार्गदर्शन केंद्रामुळे त्यांना फायदा होईल. म्हणुन त्यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करून या केंद्राच्या कार्याला शुभेच्छा! दिल्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की.पाटोदा हा दुष्काळग्रस्त व उसतोड कामगारांचा परिसर म्हणुन ओळखला जातो.तेव्हा या परिसरातील हुशार व होतकरु विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात हे मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्न केंद्र सुरू करत आहोत. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन केंद्राचा योग्य उपयोग करावा व स्पर्धा परीक्षेकडे वळावे.लागेल ती मदत व मार्गदर्शन करू!अशी ग्वाही दिली.या उदघाटन सोहळ्याचे बहारदार संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले.तर मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या समन्लयक प्रा.डॉ.श्रीमती कल्पना घारगे यांनी व्यक्त केले.या प्रसंगी ॲड.जावळे, पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस कर्मचारी उपस्थित होते,पत्रकार बांधव,स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी,सर्व प्राध्यापक बांधव व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व बहुसंख्य विद्यार्थी उटस्थित होते.शेवटी राष्ट्रगीताने या उदघाटन सोहळ्याचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## कन्नड केंद्रातील शिक्षण परिषद उत्साहात संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेल व रेलतांडा यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ जानेवारी रोजी केंद्र शाळा कन्नड नं १ येथे शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली. शिक्षण परिषदेचे उद्घाटन केंद्रप्रमुख तथा शि.अ. वि.बाजीराव ताठे, केंद्रीय मुख्याध्यापक अकबर अन्सारी, मक्रणपूरचे मुख्याध्यापक मधूकर पवार, वामनराव गावंडे मुख्याध्यापक हिवरखेडा (गौ), कन्नड नं १ चे सतिष कोळी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात झाले. केंद्रप्रमुख श्री ताठे यांनी प्रास्ताविकातून प्रत्येक शाळा गुणवत्तापूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन केले. हर्षल भगत यांनी स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. मुल्यवर्धन तालुका समन्वयक वैशाली जैन यांनी मूल्यवर्धन उपक्रम व (अध्ययन निष्पत्ती)विषयी माहिती सांगितली. पूजा मिसर यांनी निपुण महाराष्ट्र अंतर्गत वाचन विकास कार्यक्रमाविषयीचे उपस्थितांना सविस्तर प्रशिक्षण दिले. दादा साळुंखे यांनी अध्ययन निष्पत्ती विषयी मार्गदर्शन केले. रेलतांडा येथील मुख्याध्यापक रावसाहेब आहिरे यांनी कार्यक्रमात छान सूत्रसंचालन केले.दादाभाऊ साळुंखे यांचे लेखन, सुवर्णा गायके व फरहीन पठाण यांनी काढलेली रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सतिष कोळी, शिवाजी बगाड, सचिन अनवडे, हर्षल भगत, सुवर्णा गायके व फरहीन पठाण यांनी मेहनत घेतली. प्रा शा रेलचे मुख्याध्यापक विक्रम गदळे यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला. शिक्षण परिषदेत कन्नड नं १, कन्नड नं २,कन्नड नं ३, मंक्रणपुर,रेल,रेल तांडा, साखर कारखाना, ब्राह्मणी, गराडा, कोळसवाडी, गारगोटी तांडा, हिवरखेडा गौ.या शाळांतील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांचा आपत्ती व्यवस्थापन शिबिरात सहभाग




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचे विद्यार्थी अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या आव्हान शिबिरात सहभागी होण्यासाठी आज रवाना झाले. हे शिबिर दि. १७ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान संपन्न होणार आहे. यात समीक्षा कुलकर्णी, निकिता भुतेकर, गिरीजा टाकळकर, स्वाती सोनुने, करण शेजुळ, कुणाल काळे, प्रदीप लहाने, तातेराव रेवले या स्वयंसेवकाचा समावेश आहे.यावेळी त्यांना निरोप देण्यात आला.प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, डॉ. कविता प्राशर यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. क्षमा अनभुले, प्रा. अभिजीत भुतेकर, डॉ. प्रियदर्शन भवरे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तींचा समाजावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी केलेला संघटित प्रयत्न, ज्यामध्ये आपत्तीपूर्व (शमन आणि तयारी), प्रतिसाद (तातडीची मदत) आणि आपत्तीनंतरची पुनर्प्राप्ती (पुनर्वसन) या टप्प्यांचा समावेश आपत्ती व्यवस्थापनात असतो, ज्याचा उद्देश जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान टाळणे किंवा कमी करणे आहे. आव्हान शिबिरामध्ये प्रामुख्याने आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिल्या जाणार आहे. एखाद्या कठीण समय अनपेक्षित परिस्थिती उद्भवली असल्यास त्याला सामोरे कसे जावे याचे प्रशिक्षण दिले जाते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


## श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन उद्घघाटन सोहळा व नामविस्तार दिन साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दीन व मराठी भाषा संवर्धन पंधरवडाच्या विविध उपक्रमांचा उद्घघाटन सोहळा प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. यू. एस. सूर्यवंशी, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. किसन लोहार आणि प्रमुख उपस्थिती प्रा.डॉ.आशिया चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. आशिया चिश्ती यांनी नामांतराविषयी ,नामविस्तार कसा झाला याविषयी ऊहापोह करून मराठी भाषा पंधरवडा आयोजित करण्यामागील भूमिका स्पष्ट केली.त्या म्हणाल्या की.पुढचे पंधरा दिवस महाविद्यालयात विद्यार्थी आणि विद्यार्थिनी साठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात वक्तृत्व स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि विविध विचारवंतांचे विविध विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. मराठी भाषा संवर्धन म्हणजे शेवटी काय तर मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार करून त्या अनुषंगाने विविध उपक्रमांचे आयोजन करणे मराठीच्या संदर्भान्वये विविध व्याख्यात्यांचे व्याख्यान आयोजित करणे होय. म्हणूनच पुढचे १४ दिवस आपण विविध अशा या सर्व उपक्रमांचे आयोजन केले आहे .तरी सर्व विद्यार्थ्यांनी या उपक्रमामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या सुप्त कलागुणांना वाव द्यावा आणि आपल्याला व्यक्त होण्यासाठी ही एक संधी आहे हे एक व्यासपीठ आहे या संधीचा पुरेपूर लाभ घेऊन आपण मुक्तपणे या उपक्रमातून व्यक्त व्हावे असे आव्हानही त्यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. यू. एस. सूर्यवंशी यांनी नामांतर लढ्याचा रक्तरंजित इतिहास सांगून नामांतर लढ्यातील विविध टप्पे आणि प्रक्रिया समजाऊन सांगताना प्राचीन काळापासून जातीय मानसिकतेच्या सबलीकरणाचे दाखले देत हा अस्मितेचा लढा कसा दिला याचे विश्लेषणात्मक विवेचन केले. नामांतर लढा अस्मितेचा लढा असून नामविस्ताराची सबंध प्रक्रिया उलगडून दाखवली.मराठी पंधरवडा यानिमित्ताने मराठी भाषेची उत्क्रांती विषद केली .मराठी भाषेचे संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी असून प्रत्येकांनी आपल्या मातृभाषेविषयी कृतज्ञता व्यक्त करून मराठी भाषेचे संरक्षण केले पाहिजे असे सांगून कमी वेळात आशयपूर्ण व्याख्यान दिले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. किसन लोहार यांनी अभिजात मराठीविषयी कुतूहल व्यक्त करून पुढच्या उपक्रमात अभिजात मराठी विषयी व्याख्यान आयोजित करावे अशी सूचना करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व विद्यार्थ्यांनी भीम गीत गायन केले व सुरेश भटांच्या ,"लाभले आम्हास भाग्य ,बोलतो मराठी या गीतांचे गायन केले." या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नागसेन कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. मेघा जोशी यांनी केले. नामांतर लढ्यातील हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## मोबाईलवरील स्क्रीन टाईम हा ग्रीन टाईमकडे वळला पाहिजे




**जालना** : राष्ट्रीय सेवा योजनेमुळे आपल्या विचाराची दिशा निश्चित होते. शिबिरातील संस्कार हे चिरकाल टिकणारे हवेत. अलीकडे मोबाईलमध्ये आपण आपला बहुतांश वेळ घालवतो. तोच वेळ विधायक कार्यासाठी उपयोगात आणावा. स्क्रीन टाईम ते ग्रीन टाईम अशा प्रकारचे छोटे छोटे उपक्रम राबवून उत्तम आदर्श निर्माण करावेत. हा ग्रीन टाइम तुम्हाला ऊर्जा देईल. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून स्वतःला घडविले पाहिजे व त्यातून समाज सुधारेल. आपल्यातील संवेदनशीलता वाढली पाहिजे. आपणाला मिळालेला वेळ विनाकारण वाया घालू नका. तो अमूल्य आहे. असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय योजना विभागाचे संचालक डॉ. सोमिनाथ खाडे यांनी केले. गोंदेगाव जिल्हा जालना येथे दिनांक ७ ते १३ जानेवारी दरम्यान श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन केले होते त्याचा आज समारोप झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. भगवानसिंग डोभाळ म्हणाले की, आदर्श नागरिक घडविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून. आपण इतरांसाठी ही जगले पाहिजे. समाजातील विकृतीला नष्ट करून चांगले हितकारक उपक्रम राबविले पाहिजे. सामाजिक बांधिलकी आपण जपली पाहिजे.डॉ. कविता प्राशर म्हणाल्या की, समाज बदलण्याची प्रक्रिया थांबली नाही पाहिजे. समाज हळूहळू बदलत असतो. व्यक्तीने हाती घेतलेले कोणतेही काम हे लहान असते. गाडगेबाबांनी स्वच्छतेचे काम होते घेतलं आणि आज ते महान बनले. आपल्या देशात सर्व धर्माचे लोक राहतात त्या सर्वांनी मिळून राष्ट्रीयत्वाचा विचार केला पाहिजे. एकमेकाला स्वीकारण्याची आपली तयारी असली पाहिजे. तरुणांवर आज मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. त्यांनी नवा आधुनिक विचार केला तर ते देशाला पुढे घेऊन जाऊ शकतील. छोट्या छोट्या गोष्टीतून आपल्यातील आत्मविश्वास वाढत असतो. हा आत्मविश्वास विधायक कृतिशीलतेकडे वळावा. प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे म्हणाले की, सात दिवसात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून झालेले मूल्य संस्कार आपण कृतीत आणले तरच हे शिबिर यशस्वी झाले असे म्हणता येईल. नेतृत्व आणि श्रमप्रतिष्ठा जपली पाहिजे. तरच आपणाला पुढे जाता येईल. कोणतेही काम करण्यासाठी स्वतः आपण पुढे येणे गरजेचे आहे तरच इतर लोक आपल्या मागे येतील. हे लोकशाही नेतृत्व तुमच्यात आले पाहिजे. यावेळी स्थानिक प्रा. बाबासाहेब वाघ यानीही आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. उद्धव थोरवे यांनी प्रास्ताविकांत शिबिरादरम्यान राबविलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. ते म्हणाले आम्ही ग्रामस्वच्छता, सांडपाण्याची व्यवस्था यासाठी शोषखड्डे निर्मिती याचबरोबर इतरही कामे हाती घेण्यात आली होती. प्रबोधनाचे उपक्रम त्याचबरोबर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गावकऱ्यांनी उत्तम असा प्रतिसाद दिला. यावेळी विद्यार्थी स्वयंसेवक पल्लवी बागल, सृष्टी सावंत, परिदा शगुन, अनिरुद्ध निकम, आदित्य पांचाळ, कुणाल काळे यांनी शिबिरादरम्यान आलेले अनुभव सांगितले. या दरम्यान विविध उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, समाज प्रबोधन, ग्रामस्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य जनजागरण, विकासाचे उपक्रम राबविले गेले. या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमध्ये चारित्र बांधणी, नेतृत्व आणि संघटनात्मक कौशल्य तसेच समाज आणि राष्ट्र उभारणी निर्माण व्हावी यावर भर देण्यात आला. राष्ट्रीय योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. क्षमा अनभुले यांच्यासह शिक्षक व इतर स्वयंसेवक शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

सूत्रसंचालन आणि आभार प्रा. अभिजीत भुतेकर यांनी मानले. यावेळी प्रा. प्रियदर्शन भवरे, प्रा. संभाजी कांबळे, प्रा. सूर्यवंशी, प्रा. व्यंकट कोरेबोईनवाड, प्रा. प्रवीण कोंकणे, प्रा. सुरेश कागणे, प्रा.माधव हेबाडे, प्रा. विलास भुतेकर, प्रा. ओमप्रकाश चव्हाण, प्रा. प्रियंका चौंडीये आदींची उपस्थिती होती.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


# शेतकऱ्यांनी पारंपारिक शेतीला तंत्रज्ञानाची जोड द्यावी



**कन्नड : (प्रतिनिधी) :** दहावी वर्गापासून मी शेती व्यवसायात आलो. त्याचवेळी ठरवले होते की, शेती व्यवसायिक पद्धतीने करायची. त्यासाठी मी पारंपारिक शेती विकसित करून शेतीला नवी तंत्रज्ञानाची जोड दिली. एका विशिष्ट पिकावर अवलंबून न रहाता पर्यायी पीके घेतली. सुरुवातीला आठरा एकर शेती होती, डोंगर उतारावर शंभर एकर शाती घेऊन बागायती केली. पारंपारिक शेती करण्याचे दिवस आता संपले आहे. शेतकऱ्यांनी पारंपारिक शेतीला तंत्रज्ञानाची जोड देऊनशेती व्यवसायात विक्रमी उत्पादन घ्यावे असे प्रतिपादन हायटेक प्रयोगशिल शेतकरी राहुल रसाळ ( अहिल्यानगर ) यांनी केले. (ता. 16 ) येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय व बाळासाहेब पवार फाऊंडेशन कन्नड यांच्या वतीने आयोजित लोकनेते बाळासाहेब पवार व्याख्यानमालेचे आजची शेती उद्योग आणि ग्रामीण युवक या विषयावर दुसरे पुष्प गुंफण्या साठी ते प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी, पुणे हे होते. स्वयंमचे सह संस्थापक नविन काळे यांनी रसाळ यांची मुलाखत घेतली. यावेळी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार यांची उपस्थिती होती. प्रारंभी लोकनेते बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. पुढे बोलतांना रसाळ म्हणाले की, मी मजुराची खूप काळजी घेतो त्यांची राहण्याची , पाणी, विज व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था मी स्वतः विनामुल्य केली. त्यामुळे मजुरांचा प्रश्न सुटला. वर्षभर विक्रमी पैसे भेटतील असे पीक विकसित केले. प्रत्येक दिवशी पन्नास हजार उत्पादन आले पाहिजे असे नियोजन केले. पर्यायी पीके घेत राहिलो. जागतिक शेतीचा व संशोधनाचा वापर करून त्याचा उपयोग मी केला. शेतीमध्ये संयम महत्वाचा असतो. अशी व्हरायटी निवडायची ती त्याच्यावर काहीच परिणाम झाला नाही पाहिजे. द्राक्ष व डाळिंब यावर मी जास्त काम केले. माझ्याकडे पन्नास हजार लिटर पाणी दररोज उपलब्ध असते. शेती करून मी भावाबहिणींचे शिक्षण पूर्ण केले. मी ऊसाचे पीक घेत नाही. कारण या पिकावर सरकारी नियंत्रण आहे. शेतीसाठी डिस्टील वाटरचा वापर केला. असेही ते म्हणाले. शेती फायद्याची व्हायची असेल तर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. मिलिंद जोशी म्हणाले की, मी शेतकऱ्यां चा मुलगा आहे. मी शेतीची कामे केली आहे. खरी प्रतिभा ही ग्रामीण भागात आहे. विद्यार्थ्यांनी न्यून गंड बाजुला ठेवून कौशल्ये विकसित करणारे शिक्षण घ्यावे, आज झपाट्याने बदल होत आहे. केवळ पदव्या पुरेशा नाही कल्पकता सर्जनशिलता, नाविन्यता ही मूल्ये सविकारावी लागतील असेही ते म्हणाले. यावेळी चित्रकला , निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषीक वितरण करण्यात आले. कार्यक्रमास दै. सकाळचे संपादक संतोष शाळिग्राम,संस्थेचे सचिव चंद्रकांतराव देशमुख ,अन्वरखा पठाण,प्राचार्य डॉ. विजय भोसले, ॲड. कृष्णा जाधव, पोपटराव दापके, गणपतराव खरे, कौतिकराव पवार, साहेबराव अकोलकर, डॉ. रमेश सूर्यवंशी, विश्वास मोतिंगे, अजय जाधव, राजेंद्र नलावडे, रामराव शिंदे, डॉ रामचंद्र काळुंखे, डॉ. रविंद्र काळे, रविंद्र पवार, प्राचार्य डॉ. राहुल क्षिरसागर, रामकृष्ण पवार, संजय खोरे डॉ. रुपेश मोरे, संजय जाधव, उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर , डॉ. उदय डोंगरे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. शिवाजी हुसे,प्रा. एच. जी. पवार, प्रा. आर.टी. नागे, पत्रकार संतोष निकम, प्रविण जंजाळ, श्री मूचक, यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक शेतकरी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक भोसीकर यांनी तर आभार पोपटराव दापके यांनी मानले.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


# किनगाव राजा राष्ट्रवादी पार्टी शहराध्यक्षपदी शेख लतिफ कुरेशी यांची निवड



**बुलढाणा (महेश मुंढे) :** किनगाव राजा:-राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) किनगाव राजा शहराध्यक्षपदी शेख लातिफ कुरेशी यांची निवड करण्यात आली. पक्ष संघटन बळकट करण्याच्या दृष्टीने ही निवड महत्त्वाची मानली जात आहे.या निवडीप्रसंगी तालुका अध्यक्ष सिद्धार्थ भाऊ जाधव यांच्यासह सरपंच प्रकाश मुंढे,रवी काळुसे, विष्णू मांटे, पंढरीनाथ काकड, ज्ञानेश्वर झोरे, फारूक कुरेशी, अल्ताफ कुरेशी, साबिर शेख, शेरू शेख, हाफिज कुरेशी, वसीम कुरेशी, दानिश कुरेशी, इमरोज, मुन्ना शेख, धीरज खरारे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी शेख लातिफ कुरेशी यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचा उल्लेख करत त्यांच्या नेतृत्वाखाली किनगाव राजा शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला. पक्षाच्या ध्येयधोरणांना तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवून सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. निवडीनंतर शेख लातिफ कुरेशी यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत, शहरातील युवक, शेतकरी व सर्व घटकांना सोबत घेऊन पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही दिली.

# अब्दुल मजीद सालार इक़रा उर्दू हायस्कूल, बोरनारची बहुआयामी शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**जळगाव :** इक़रा एज्युकेशन सोसायटी जळगांव संचलित अब्दुल मजीद सालार इक़रा उर्दू हायस्कूल, बोरनार येथील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत शाळेतील 82 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.सहलीचा पहिला टप्पा चोपडा येथील साखर कारखाना येथे पार पडला. येथे विद्यार्थ्यांना ऊस गाळप प्रक्रिया, साखर निर्मितीचे विविध टप्पे, आधुनिक यंत्रसामग्री व व्यवस्थापन पद्धती यांची सविस्तर माहिती देण्यात आली. याच ठिकाणी शाळेतर्फे विद्यार्थ्यांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांनी ताजेतवाने होऊन पाहणीचा आनंद घेतला.यानंतर विद्यार्थ्यांनी शिरपूर येथील सूतगिरणी येथे भेट दिली. येथे कापसापासून सूत तयार होण्याची संपूर्ण प्रक्रिया, यंत्रांचे कार्य व गुणवत्ता नियंत्रणाबाबत माहिती माळी साहेब कडून देण्यात आली. याच ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी दुपारच्या जेवणाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. जेवणानंतर विद्यार्थ्यांनी सामूहिक गीत गायनाच आनंद लुटला, ज्यामुळे सहलीचे वातावरण अधिकच उत्साही व प्रसन्न झाले.पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांनी मिनी एअरपोर्ट ची पाहणी केली. येथे विमानतळाची रचना, धावपट्टीचे महत्त्व, सुरक्षितता व्यवस्था तसेच हवाई वाहतुकीची प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.सहलीच्या शेवटच्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी शिरपूर येथे उद्यान येथे भेट देत विविध झोके, बोटिंग व मिनी ट्रेन चा आनंद घेतला. अभ्यासासोबतच मनोरंजनाची संधी मिळाल्याने विद्यार्थी अत्यंत आनंदी व उत्साही दिसून आले.ही शैक्षणिक सहल प्रभारी मुख्याध्यापक आरिफ खान सर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व सुरक्षितरीत्या पार पडली. सहल प्रमुख म्हणून मजहर खान सर व फिरोज खान सर व जव्वाद अंजुम सर यांनी नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तसेच शेख रोशन सर, शेख अमीर सर, युसुफ भाई व आपा यांनी सहलीदरम्यान मोलाचे सहकार्य केले. सहल यशस्वी साठी सादिक सर, आबीद सर, लिपिक आकिब सर व मुश्ताक भाई यांच्या सहकार्य लाभला. सहल यशस्वी झाल्याबद्दल संस्थाध्यक्ष डॉक्टर अब्दुल करीम सालार साहेब यांनी सांगितले कीही सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, अनुभवसमृद्ध, आनंददायी व प्रेरणादायी ठरली असून प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेले ज्ञान त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस निश्चितच उपयुक्त ठरेल, व सर्वांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


## इस्त्रो सहल निवड चाचणीत जिल्हा परिषद प्रशाला बहिरगावचे घवघवीत यश




**कन्नड प्रतिनीधी** : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) सहल निवड चाचणी २०२६ मध्ये जिल्हा परिषद प्रशाला बहिरगावच्या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. बहिरगाव केंद्रांतर्गत झालेल्या या चाचणीत शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वच्या सर्व १० क्रमांक पटकावत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवण्याचा बहुमान मिळवला आहे.१० जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या चाचणीत बहिरगाव प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली. विशेष म्हणजे, या केंद्रातून निवड झालेले सर्व विद्यार्थी बहिरगाव शाळेचे असून, शाळेच्या शैक्षणिक दर्जेदार गुणवत्तेचा हा एक मोठा पुरावा मानला जात आहे.इयत्ता ८ वी: शिवप्रसाद सुराशे (९२ गुण), श्रीहरी शिंदे (९० गुण), अभय आवले (८८ गुण).इयत्ता ६ वी: दर्शन बनकर (७० गुण), साई उगले (६६ गुण).विद्यार्थिनी गट (८ वी): अपूर्वा पवार, अंकिता जाधव आणि शिवकन्या दापके यांनी प्रत्येकी ९० गुण मिळवून यश संपादन केले, तर श्रद्धा दापके व शरयू दापके यांनी ८८ गुणांसह बाजी मारली.या यशामागे विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शाळेतील शिक्षक श्री. गणेश बल्लाळ आणि श्रीमती किसनाबाई गोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयात विद्यार्थ्यांची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट या निकालातून स्पष्ट दिसत आहेत. आता हे विद्यार्थी तालुकास्तरीय चाचणीसाठी सज्ज झाले आहेत. तिथे निवड झाल्यास त्यांना जिल्हास्तरीय चाचणी देण्याची संधी मिळणार आहे. भविष्यातील वैज्ञानिक घडविण्याच्या दृष्टीने शाळेने टाकलेले हे पाऊल संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.या यशाबद्दल प्रशालेच्या प्रभारी मुख्याध्यापिका नूतन पवार तसेच शाळेतील शिक्षक दिलीप महाजन, कुलभूषण व्यवहारे, राजेंद्र शिंपी, ,सलीम आतार , श्याम खोसरे, श्रीमती किरण पाटील , राधेश्याम शर्मा, स्वप्निल गांगुर्डे, गणेश बल्लाळ, रवींद्र ठाकरे, किसना बाई गोरे, सविता कुंटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

## सनातन दु:खाची सखेद वेदना मुखर करणारी कविता : धागेदोरे



**क**वी अशोक पाठक परतूर यांचा हा चौथा कवितासंग्रह.मानवी मनाच्या संवेदना अतिव कातिव मुळंगाठीने व्यक्त झाल्या आहेत.कविता ही एक अस्सल सल घेऊन येणारी असते.कधी ती मुक्त व्यक्त सुखदु:खाची पखरण करते.आपल्या सभोवतालचे क्षण शब्दबद्ध होताना आंतरिक भाव कल्लोळ हा तिचा स्थायी भाव असतो.तर ती ओंजळभर सुखाचं गीत गाते.कवी अशोक पाठक सर हे या मायमातीचे ऋण कायमचं हृदय स्पर्शी होऊन जगणारे एक सृजनशील स्नेहाळू अंतरंगी गीत संगीत कंठात गुंफणारे निस्सीम भक्तीने काव्याची आराधना करीत हे धागे दोरे कायम सहृदयी गुंफित आले आहेत.म्हणून ते लिहितात 'कविते शिवाय पर्यायच नसेल', 'मंतरलेले शब्द','दु:ख,'न राहून' 'पुनः तेच केलं', मानवी मनाचे असंख्य धागेदोरे विचारांच्या चिंतन चिकित्सक तेनेगुंफून गेलेले असते म्हणून कविते शिवाय पर्यायच नाही. "इतकी युग आली आणि गेली तसे हे ही युग जाईल बघ तेव्हा ही कविते शिवाय पर्यायच नसेल"(पृष्ठ ११)कवीचा आत्मा हा पुण्यवंत होऊन व्यापक सम्यक दृष्टी देऊन जातो.मंतरलेले शब्द घेऊन मासा गळाला लागला.दु:खाला कुरवाळने आलेच.ते तटकन तोडून टाकता येतं नाही.कारण ते सनातन आहे.तरही न राहून स्वप्न पाहणं ही वृत्तीचं आहे.क्षणीक सुखद अनुभवांच्या अंधार गुहेत गेलेला जीव जीवाला सोडवत नाही.सुखलोलूप होऊन दु:ख ओरबाडून सांगून टाकणे.झाडाचे नदीचे, पशूपक्षी, प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात घालून माणूस त्यांचा विचार करत नाही.समुद्राचे वडवानल,रानाचा वनवा हा त्या जीवाला दु:ख देऊन जातो.तसं प्राणी चटक्कन दु:ख टाकून जगण्याची लढाईत उतरतो.माणुस दु:खाचे भांडवल मांडून त्याचा बाजार मांडतो कवी लिहितो एक कविता "गावाला गाव म्हणत होतो आणि चालतं होतो. रस्ते झाड आणि हुबेहूब चेहऱ्या सारखे चेहरे वाचत वाचत पुढे शेवटच्या पानावर आलो आणि झाडाचे पुस्तक झाले..."(पृष्ठ २०)तसा हरेक माणूस एक साक्षात पुस्तक आहे.या सृष्टीतलं सारे जीव धोक्यातचं जगता आहेत.या भंयकराच्या यंत्र तडाख्यात माणूस केवळ स्वांत सुखाच्या परमोच्च आनंद शोधतो आहे.तो मिळतो क्षणीक पण धावणे थांबत नाही.अशी घट्ट जगण्याची अस्सल चिंतन आशयाचे धागेदोरे देऊन जाणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून आली आहे.'कवितेली माणसं'पुस्तक', 'घर','काळाचे डोळे','भान' "कविते मागितले होते भान उद्याचे आणि दान नद्यांचे भरलेल्या डोळ्यांनी ह्या वाहत राहवे सारखे सारखे म्हणून तर हात पसरले होते या फडफडत्या पुस्तकांनी इथे"...(पृष्ठ २५)कवी पाठक यांचे निरीक्षण अतिशय तरल सुक्ष्म असल्याने ही कविता मानवी मनाचे पिळ पिळवटून काढते.जसे 'जोडले चार नाते खरे असावेत.भार त्यांच्या खांद्यावर,ते खांदे बरे असावेत' खंद्याचे खांदेच लेचेपेचे झाले.विश्वासघेऊन आपुलकीच्या मायेनं या कवितेमधून धागेदोरे असे काही विनले गेले आहे की,कवी सुख दु:खाची वर्गवारी करतो.या भूमियांच्या जगण्याचे हलाहल पाहताना दुसरा पांढरपेशा वर्ग तो सुखाची भाकर खातो आहे.त्याच्या तोंडातला घास हा कुणाचा आहे.कवी लिहितो."पावसाची वाट पाहुन थकतात आणि वाकतात मग कमरेतून ह्याच्या त्यांच्यापुढेखूप वर्ष झालीत कवितेतली माणसं फिरत आहेत भाकरीसाठी...आता ही सुद्धा कालची गोष्ट माणसं मागत होतीहक्काची चाकरी आणि पोटाला पोटभर भाकरी.."कवितेची चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक पाठराखण कवी पी विठ्ठल लिहितात"शारीर अनुभवाच्या पलीकडे जाऊन जीवनातल्या शाश्वत सौंदर्याचा, मानसिक विभ्रमाचा आणि विविध भावतरंगाचा निरमयतेने शोध घेणे.हे वाटते तितके सोपे नसते.प्रत्येक अनुभवाच्या मागे विविधांगी भाव आणि अर्थच्छटा दडलेल्या असतात.आत्मसंयम आणि सौंदर्यभान असेल तरच या भावस्थितीला समजून घेता येते.केवळ अनुभवांचा पाठलाग करून मौनची परिभाषा बोलकी करता येतं नाही.त्यासाठी अत्यंत संवेदनशील असे मन सर्जकाकडे असते.धागेदोरे हा अशोक पाठक यांच्या कवितासंग्रहातूनहा संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो "(पी.विठ्ठल) कवी धागेदोरे या कवितेचा अनुबंध असा. "हे संभोगाचे धागे विनत बसलोत आपण स्पर्शाच्या ओल्याचिंब सरींना बाळगत बसलो आपण जवळ अजून जवळ अशी घट्ट मिठी झालोत आपण युगानुयुगापासून जणू एकमेकांचे झालोत आपण "(पृष्ठ ३८)मानवी मनाचे श्लोक जणू ही कविता गाते आहे.यात अतिशय उत्तम आशय असल्याने चिंतनाची किनार आहे.कवी केशव खटिंग यांची मनस्वी प्रस्तावना लाभली आहे."माणसाच्या समकाल आणि भूतकाळातल्या दु:खा सोबत कवी त्याच्या आदिम दु:खाला हात घालतो.या दु:खाला कवी वाट काढून देईल असे म्हणतो.कविता माणसांचे जग सुखी करण्यासाठी धडपडते.कविता हिच अंतिम विश्वासार्ह गोष्ट आहे असे कवीला वाटते."(पृष्ठ ८) ख्यातनाम कवी चित्रकार भ.मा.परसावळे याचे मुखपृष्ठ व अतील रेखाटने अतिशय चिंतन आशय संपन्न झाले आहेत.इसाप प्रकाशन दत्ता डांगे यांनी अतिशय उत्तम कवितासंग्रह दिला आहे.कवी अशोक पाठक यांचे पाच कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत.कवीस मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक : धागेदोरे : कवी अशोक पाठक**
**प्रकाशक :- श्री दत्ता डांगे**
**प्रकाशन : इसाप प्रकाशन, नांदेड**
**मुखपृष्ठ व रेखाटने : भ. मा. परसवाळे**
**मूल्य :-१५०**
**पुस्तक परिचय : डॉ प्रभाकर शेळके,**
**जालना संवाद : ९९७५१३७३३७**

## "युवकांनी आपली संस्कृती जपणे गरजेचे, श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी" - प्राचार्य डॉ. संजय अस्वले.




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील वाणिज्य विभाग वाणिज्य मंडळ क्वालिटी सर्कल आणि महाविद्यालयाच्या करिअर कट्ट्याच्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त युवा सप्ताह साजरा करताना युवक आणि युवतींसाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी केले. मुलांनी स्वामी विवेकानंदांचे आदर्श संस्कार, मूल्य-संस्कृती आचरणात आणली तरच मुलींनी राजमाता जिजाऊ चे आदर्श घेऊन आपले संस्कार मूल्य संस्कृती जपावी तरच भावी आदर्श पिढी घडेल. श्रद्धा ठेवावी पण अंधश्रद्धा ठेऊ नये. असे प्रतिपादन डॉ अस्वले यांनी उद्घाटन पर मार्गदर्शनात केले.दिनांक १२ जानेवारी ते १३ जानेवारी २०२५ असे दोन दिवसीय उपक्रमात रांगोळी स्पर्धा, निबंध, वक्तृत्व आणि पोस्टर स्पर्धा, वेषभूषा स्पर्धा आणि समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रथम राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आयोजित रांगोळी स्पर्धेमध्ये १६ विद्यार्थ्यांनी, पोस्टर स्पर्धेमध्ये ११ तर पारंपरिक वेशभूषा स्पर्धेमध्ये २२ आणि निबंध स्पर्धेमध्ये २८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजित अष्टे सर, प्रमुख पाहुणे म्हणून करिअर कट्ट्याचे समन्वयक प्रा. डॉ. पसरकले सर आणि प्रा. डॉ. करे सर, वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. यावेळी स्त्री सशक्तीकरण आणि युवा जनजागृती या विषयावर कुमारी सानिका जाधव, सना चौधरी, इंगळे प्रियांका, लक्ष्मी हिरमुखे, निकिता चांदोरे, प्रतिभा यादव, गणेश मोरे, प्रसाद मम्माले, सुरवसे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. तर विद्यार्थ्यांनी आपले लक्ष्य साध्य करण्यासाठी महापुरुषांचे विचार समोर ठेवून कार्य करावे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करतेवेळी डॉ अजित अष्टे यांनी केले. यावेळी करिअर कट्टा विद्यार्थी संसद पदाधिकारी यानी बारामती येथील अधिवेशनातील अनुभव आणि उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज सूर्यवंशी यांनी केले तर आभार सौरभ पाटील यांनी मानले. परीक्षक म्हणून डॉ. श्रीशैल तोडकर प्रा. सूरज सूर्यवंशी यांनी काम पाहिले.तर कार्यक्रमासाठी डॉ. खंडू मुरळीकर डॉ. विजय मुळे ओमप्रकाश पवार, प्रा. अक्षता बिराजदार, प्रा. संध्या चौगुले, प्रा .विद्या गायकवाड आणि वाणिज्य मंडळ कल्चरल क्वालिटी सर्कल चे सदस्य आणि करिअर कट्टा चे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १७ जानेवारी २०२६


## भारतीय डाक विभागाच्या विविध योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा - डॉक्टर संजय लिये



**(जिंतूर) बी. डी. रामपूरकर :** शहरातील शकुंतला बोर्डीकर कनिष्ठ महाविद्यालयामध्ये दि १४ जानेवारी बुधवार रोजी दुपारी ग्रामीण डाक सेवक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ संजय लिये डाक अधीक्षक परभणी यांनी सर्व नागरिकांनी भारतीय डाक विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.या प्रशिक्षण मेळाव्यास जिंतूर,मंठा ,येलदरी, बोरी, झरी, औंढा -नागनाथ, सेनगाव सब पोस्ट ऑफिस अंतर्गत ८० ब्रांच पोस्ट मास्तर व त्यांच्यासह सब पोस्टमास्तर प्रशिक्षणास उपस्थित होते. या प्रशिक्षणास डॉ संजय लिये डाक अधीक्षक परभणी, बालासाहेब शिंदे डाक निरीक्षक उपविभाग जिंतूर, शेख इर्शाद पोस्ट मास्तर जिंतूर, राजेश दुकानदार ,अभिजीत जोशी, भगवान वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. डाक विभागाच्या वतीने. एपीटी २.० पीओएसबी योजना स्पीड आणि पार्सल आरएसबीटी सेल) अंतर्गत ग्रामीण डाक सेवकांना प्रशिक्षण देताना लिये यांनी सांगितले की प्रत्येक ग्रामीण भागातील ऑफिसमध्ये डाक विभागाच्या विविध योजनांची माहिती पुरविण्यासाठी एक माहितीपत्रक तयार करून दिली आहे. तसेच ग्रामीण भागातील व शहरी भागातील नागरिकांनी टपाल विभागाच्या विविध योजना जसे सेविंग अकाउंट, सुकन्या समृद्धी योजना ,टपाल जीवन विमा ,ग्रामीण डाक जीवन विमा, टी ,डी अकाउंट, आवर्ती बचत खाते,राष्ट्रीय बचत पत्र, किसान विकास पत्र, मासिक आय योजना, सीनियर सिटीजन सेविंग स्कीम अकाउंट ,इंडिया पोस्ट पेमेंट बँक अंतर्गत शासकीय विविध योजनांचे अनुदान लाभ मिळतात .केंद्र शासनाच्या विविध योजनांचे अनुदान सुद्धा सेविंग बँक, इंडियन पेमेंट बँक मार्फत नागरिकांना मिळू शकतात. सेविंग बँकेमार्फत एटीएम, चेक बुक, नेट बँक या सुविधांचा लाभ मिळू शकतो तसेच इंडिया पेमेंट बँके मार्फत फोन पे द्वारे, यूपीएद्वारे अनेकांना पेमेंट पाठविता येते .त्यामुळे नागरिकांनी जास्तीत जास्त पोस्ट ऑफिस मध्ये खाते उघडावे .तसेच नागरिकांनी पार्सल सुविधाचा सुद्धा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भविष्यात रोजगाराच्या असंख्य संधी - नदीम सय्यद




**उमरगा :** येथील भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात गुरुवार दिनांक १५ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त साजरा होत असलेल्या "राष्ट्रीय युवक सप्ताह" निमित्त संगणक शास्त्र विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी “नेक्स्ट जनरेशन करिअर इन आयटी” या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री नदीम सय्यद टीम लीडर कॉग्निजंट प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांचे मार्गदर्शन झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना "माहिती तंत्रज्ञान क्षेत्र भविष्यातील करियर साठी निवडावे, यात त्यांना रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. डेटा इंजिनिअरिंग, एसआरए इंजिनिअरिंग, क्लाऊड कम्प्युटिंग, मशीन लर्निंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यामधील वेगवेगळ्या संधी उपलब्ध असून याविषयी विद्यार्थ्यांनी तयारी ठेवावी.” असे सर्वांना आवाहन केले. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ संजय अस्वले होते. त्यांनी याप्रसंगी भविष्यामध्ये होणाऱ्या बदलाला जो सामोरे जाईल तो आयटी इंडस्ट्री मध्ये टिकेल असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये उप प्राचार्य डॉ पी ए पिटले, डॉ भरत शेळके एन एस एस कार्यक्रमाधिकारी, डॉ अनिल देशमुख, डॉ अजय कांबळे, तसेच संगणक शस्त्र विभागातील प्राध्यापक व एनएसएस विभागाचे सर्व कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ सूर्यकांत रेवते यांनी केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्राध्यापक आरती जाधव यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गणेश मोरे यांनी केले तर श्री अब्रार कादरी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## विद्यापीठ नामांतर लढ्यात अनेकांच्या घराची झाली राखरांगोळी- डॉ. बाळासाहेब लिहिणार




**करमाड-** राजीव गांधी कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय करमाड येथे एनएसएस आणि इतिहास विभागाअंतर्गत नामविस्तार दिनाच्या निमित्ताने डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठ नामांतर लढ्याला उजाळा देताना डॉ.बाळासाहेब लिहिणार म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा म्हणजे केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता,तर तो अनेकांच्या घराची प्रतिपाद्यानी केलेल्या राखरांगोळीमुळे अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला होता. विद्यापीठाचं नामांतर हे केवळ आंदोलन नव्हतं,तर त्याला सामाजिक लढ्याचे स्वरुप आलं होतं.ही चळवळ म्हणजे महाराष्ट्रातील आणि देशातील सर्वात मोठी लढाई होती. या लढ्यात अनेक क्रांतिकारक शहीद झाले. कितीतरी युवक – युवतींना आपले प्राण गमवावे लागले होते. पोचीराम कांबळे, जनार्दन मवाडे, चंदर कांबळे, गौतम वाघमारे, सुहासिनी बनसोड, अब्दुल सत्तार असे अनेकांना आपला जीव गमवावा लागला. नामांतराचा लढा केवळ बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला देण्यासाठीचा राहिला नव्हता तर त्या लढ्याचे स्वरुप जाती विरुध्द नवचेतनेने भारलेल्या आंबेडकरवादी जनतेच्या अस्तित्वाचा झाला होता.नामांतरासाठी प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपुर ते औरंगाबाद लॉंगमार्च काढला.यात फार मोठी हानी झाली. या काळात प्रतिगाम्यांनी इतका अतिरेख केला होता की लोक गाव सोडून शहरात स्थाईक झाले होते. शहराशहरात अनेक झोपडपट्याची निर्मिती म्हणजे प्रतिगामी मंडळीची गावात वाढवलेली दहशतीतून झालेली निर्मिती होय.हा लढा सतत चाललेला सतरा वर्षाचा लढा होता.सरकार वेळकाढू धोरण अवलंबित होते आणि आंबेडकरवादी जनता थांबायला तयार नव्हती. त्यामुळे दलीत सवर्ण संघर्ष अधिक पेटला होता. दलितांच्या घरादाराची राख रांगोळी होत होती पण ते मागे हटत नव्हते. संपूर्ण महाराष्ट्रात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. आंबेडकरवादी जनतेचा दबाव वाढला.आणि या दबावाला शेवटी सरकार झुकले व नामांतराऐवजी 1994 ला मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार “डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ”असा करण्यात आला. अशा परखड शब्दामध्ये डाॅ.बाळासाहेब लिहिणार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यानिमित्ताने प्रा.प्रशांत माठे यांनी देखील नामविस्तार दिनाविषयी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डाॅ.एस.एस.मुळे यांनी नामविस्तार दिनाचे महत्त्व सांगुन मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्ताविक डाॅ.कालिदास फड यांनी केले. सुत्रसंचलन डाॅ. योगेश शिंदे आणि आभार डाॅ.किशोर काळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ.लक्ष्मण दांडगे,डॉ. सुखदेव पोटदुखे,डॉ.इम्रान पठाण, प्रा. हरिदास होळकर,डॉ.लावंड, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. घोडके, डॉ.रमेश कचरे, कैलास जाधव, मधुकर राठोड, बाळू जाधव आदी कर्मचारी व विद्यार्थी ऊपस्थित होते.

## रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**बुलढाणा (महेश मुंढे) :** रस्ता सुरक्षा अभियानाच्या अनुषंगाने आज दिनांक १७/०१/२०२६ रोजी (शाळेचे नाव), नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड तसेच कामाक्षा विद्यालय किनगाव राजा, नूतन माध्यमिक विद्यालय किनगाव राजा येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी पोलीस स्टेशन किनगाव राजा रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार संजय मातोंडकर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. रस्ता अपघातांची प्रमुख कारणे, वाहतूक नियमांचे महत्त्व, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर, चारचाकी वाहनात सीटबेल्ट लावण्याचे फायदे, वेगमर्यादेचे पालन, मोबाईल वापरून वाहन चालवण्याचे धोके तसेच झेब्रा क्रॉसिंग व सिग्नलचे पालन याबाबत माहिती देण्यात आली.विद्यार्थ्यांनी रस्ता सुरक्षा नियम पाळण्याचा संकल्प घेतला असून, पालकांनाही नियम पाळण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेतला.या वेळी पोलीस स्टेशनचे पोहेका सतीश सवडे, पोलीस कॉन्स्टेबल मदन मुळे,मदन मान्टे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने यशस्वी ठरला.